
क्र. १४६ पहिले वर्ष

२८ मे २०२३

# रविवारची  उपासना

## पवित्र आत्म्याच्या आगमनाचा रविवार

### प्रस्तावना

पेन्टेकॉस्टचा (म्हणजे पन्नासावा) दिवस आला तेव्हा ते सर्व एकत्र जमले असता, अकस्मात मोठ्या सुसाट्यासारखा वाऱ्याचा आकाशातून नाद झाला आणि ज्या घरात ते बसले होते ते सर्व त्याने भरले.

यशया भविष्यवाद्याने पवित्र आत्म्यात वेगवेगळ्या देणग्या असल्याचे अगोदरच सांगितले होते. भविष्यवादी म्हणतो : ''तो ज्ञानाचा आणि सुज्ञपणाचा आत्मा आहे, तो मार्गदर्शनाचा आणि शक्तीचा आत्मा आहे, तो ईशज्ञानाचा आणि ईशभक्तीचा आत्मा आहे'' (यशया ११:२). संत पौल यथार्थपणे सांगतो, ज्याअर्थी आपण आत्म्याने राहतो त्या अर्थी त्याच्या मार्गदर्शनानुसार आपण चालावे म्हणून आपण आजच्या मिस्साबलीत विशेष प्रार्थना करूया.

### प्रास्ताविक प्रार्थना

**आपण प्रार्थना करू या.**

हे परमेश्वरा, आमच्या स्वर्गीय बापा, सुवार्तेच्या प्रचाराचा प्रारंभ करण्यासाठी तू तुझ्या ख्रिस्तसभेवर पवित्र आत्म्याला पाठवलेस. तोच पवित्र आत्मा सर्व श्रध्दावंतांच्या जीवनाद्वारे या जगात आपले सुवार्ताप्रचाराचे कार्य सदैव चालू ठेवो. ही प्रार्थना आम्ही, तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात सर्वकाळ जिवंत राहणारा व राज्य करणारा, एकच परमेश्वर, तुझा पुत्र, आमचा प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे करतो.

**प्रभूशब्द विधी**

### पहिले वाचन

**प्रेषितांची कृत्ये या पुस्तकातून घेतलेले वाचन २:१-११**

**''सर्वजण पवित्र आत्म्याने परिपूर्ण झाले आणि बोलू लागले.''**

पेन्टेकॉस्ट म्हणजे पन्नासावा दिवस आला तेव्हा ते सर्व एकत्र जमले असताना, अकस्मात मोठ्या सोसाट्याच्या वाऱ्याचा आकाशातून नाद झाला आणि ज्या घरात ते बसले होते ते सर्व त्याने भरले आणि वेगवेगळ्या होत असलेल्या अग्नीच्या जिभांसारख्या जिभा त्यांना दिसल्या आणि प्रत्येकावर त्या एकएक अशा बसल्या. तेव्हा ते सर्वजण पवित्र आत्म्याने परिपूर्ण झाले आणि आत्म्याने जसजशी त्यांना वाचा दिली तसतसे ते निरनिराळ्या भाषांतून बोलू लागले.

त्या वेळेस आकाशाखालच्या प्रत्येक राष्ट्रातील भक्तिमान यहुदी यरुशलेममध्ये राहत होते. तो नाद झाल्यावर लोकसमुदाय एकत्र होऊन गोंधळून गेला. कारण प्रत्येकाने त्यांना आपआपल्या भाषेत बोलताना ऐकले. ते सर्व आश्चर्याने थक्क होऊन म्हणाले, ''पाहा, हे बोलणारे सर्व गालीली ना? तर आपण प्रत्येक जण आपआपली जन्मभाषा ऐकतो हे कसे पार्थी, मेदी, एलामी, मेसोपटेम्या, यहुदीया, कप्पुदुकिया, पंत, आसियास, प्रुगिया, पंफुलिया, मिसर आणि कुरणेच्या जवळचा लिबुआ देश ह्यात राहणारे, यहुदी आणि यहुदीयमतानुसारी असे रोमन प्रवासी, क्रेतीय, अरब असे आपण त्यांना आपआपल्या भाषात देवाची महत्कृत्ये सांगताना ऐकतो.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### प्रतिसाद स्तोत्र

**१०३:१. २४, २९-३०, ३१-३४**

प्रतिसाद : **हे प्रभो, तू आपला आत्मा पाठव आणि पृथ्वीला नवजीवन दे.**

१. हे माझ्या जिवा, परमेश्वराचा धन्यवाद कर. हे परमेश्वरा, माझ्या देवा, तू परमथोर आहेस. हे परमेश्वरा, तुझी कृत्ये किती विविध आहेत! तुझ्या संपत्तीने पृथ्वी परिपूर्ण आहे.

२. तू त्यांचा श्वास काढून घेतोस तेव्हा ते मरून मातीत मिळतात तू आपला आत्मा पाठवतोस तेव्हा ते उत्पन्न होतात आणि तू पृथ्वीचा पृष्ठभाग नवा करतोस.

३. परमेश्वराचे वैभव चिरकाल राहो! परमेश्वराला आपल्या कृतीपासून आनंद होवो! मी केलेले त्याचे मनन त्याला गोड वाटो. परमेश्वराच्या ठायी मला हर्ष होईल.

### दुसरे वाचन

**पौलचे करिंथकरांस पहिले पत्र यातून घेतलेले वाचन**

**१२:३-७. १२-१३**

**''आपणा सर्वांना एका आत्म्यात बाप्तिस्मा मिळाला आहे.''**

पवित्र आत्म्याच्या योगे बोलल्यावाचून कोणालाही ''येशू हा प्रभू आहे'' असे म्हणता येणार नाही.

कृपादानांचे निरनिराळे प्रकार आहेत, तरी आत्मा एकच आहे. सेवा करण्याचे निरनिराळे प्रकार आहेत, तरी प्रभू एकच आहे आणि कार्याचे निरनिराळे प्रकार आहेत तरी सर्वात सर्व कार्ये करणारा देव एकच आहे. तथापि आत्म्याचे प्रगटीकरण सार्वजनिक हितासाठी एकेकाला होते.

कारण जसे शरीर एक असून त्याला अवयव पुष्कळ असतात आणि त्या शरीराचे अवयव पुष्कळ असून सर्व मिळून एक शरीर बनते, तसाच ख्रिस्त आहे. कारण आपण यहुदी असू किंवा हेल्लेणी असू, गुलाम असू किंवा स्वतंत्र असू, एक शरीर होण्यासाठी आपण सर्वांना एका आत्म्यात बाप्तिस्मा मिळाला आहे आणि आपण सर्व एकाच आत्म्याने संचरित झालो आहोत.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### जयघोष

**आलेलुया, आलेलुया!**

हे पवित्र आत्म्या, ये, तुझ्या श्रध्दावंतांची हृदये व्यापून टाक आणि तुझा प्रेमाग्नी त्यांच्या हृदयात प्रज्वलित कर,

**आलेलुया!**

### शुभवर्तमान

**योहानलिखित शुभवर्तमानातून घेतलेले वाचन**

**२०:१९-२३**

**“जसे पित्याने मला पाठवले आहे तसे मीही तुम्हांला पाठवतो. पवित्र आत्म्याचा स्वीकार करा.”**

आठवड्याच्या पहिल्या दिवशी संध्याकाळी जेथे शिष्य होते तेथील दारे यहुद्यांच्या भीतीमुळे बंद असता, येशू आला आणि मध्ये उभा राहून म्हणाला, “तुम्हांस शांती असो.” असे बोलून त्याने आपले हात आणि कूस त्यांना दाखवली. तेव्हा प्रभूला पाहून शिष्यांना आनंद झाला. येशू पुन्हा त्यांना म्हणाला, “तुम्हांस शांती असो. जसे पित्याने मला पाठवले आहे तसे मीही तुम्हांला पाठवतो.” असे बोलून त्याने त्यांच्यावर फुंकर टाकली आणि त्यांना म्हटले, “पवित्र आत्म्याचा स्वीकार करा. ज्या कोणाच्या पापांची तुम्ही क्षमा करता त्यांची क्षमा झाली आहे आणि ज्या कोणाची तुम्ही तशीच ठेवता ती तशीच ठेवलेली आहेत.”

**प्रभूचे हे शुभवर्तमान**

## श्रध्दावंतांच्या प्रार्थना

**प्रास्ताविक**

बंधू आणि भगिनी म्हणून ख्रिस्ताठायी आपण एकत्र जमलो आहोत. प्रभूने आपल्यावर केलेल्या अनेक उपकारांची आपण आठवण करू या. प्रार्थना करण्यास परमेश्वर आपल्याला स्फूर्ती देतो. आमच्या प्रार्थना स्वीकारण्यास आपण त्याला विनंती करू या.

आपला प्रतिसाद असेल – **कर दानांचा वर्षाव देवा, वरदानांचा वर्षाव.**

१. ख्रिस्तसभेची समर्थपणे धुरा सांभाळणाऱ्या धर्मगुरू, धर्मभगिनी व धर्मबंधूंना परमेश्वराच्या दयेचा, प्रेमाचा व कृपेचा स्पर्श व्हावा म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करू या.

२. ज्ञानदानाची जी मौलिक जबाबदारी देवाने शिक्षणदात्यांवर सोपविली आहे ती प्रत्येक शिक्षकाने मान्य करावी व त्यानुरूप असलेले शिक्षकांचे वर्तन विद्यार्थीवर्गाला प्रेरणादायी ठरावे, म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करू या.

३. आपल्या प्रत्येकाच्या नोकरीधंद्यावर व शेतीवाडीतील कामावर परमेश्वराचा भरपूर आशीर्वाद असावा व आमचे जीवन बहरावे, म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करू या.

४. शांती निर्माण करण्यासाठी व समेट घडवून आणण्यासाठी जगभर अनेक संघटना कार्यरत आहेत, त्यांच्या कार्याला यश प्राप्त व्हावे, म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करू या.

५. आपल्या कौटुंबिक व वैयक्तिक हेतूंसाठी, आपण प्रार्थना करू या.

## समारोप

हे स्वर्गीय पित्या, तुझ्या ख्रिस्तसभेच्या प्रार्थना ऐक. आमच्या श्रध्देमधील उणीवा तुझ्या प्रेमाने भरून काढ. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

## अर्पणावरील प्रार्थना

हे प्रभो, तू अभिवचन दिलेल्या पवित्र आत्म्याद्वारे आम्हाला परिपूर्ण सत्याचे दर्शन घडव व या बलिदानाचा परिपूर्ण अर्थ उघड कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो.

## प्रसादानंतर प्रार्थना

हे सर्वसमर्थ बापा, या ख्रिस्तप्रसादाच्या रूपाने आम्हांला दिव्य अन्न मिळत आहे. या अन्नाने सार्वकालिक तारणप्राप्तीसाठी आम्हांला साहाय्य कर. तुझ्या पवित्र आत्म्याची कार्यशक्ती आम्हांमध्ये टिकवून ठेव. तू ख्रिस्तसभेला दिलेल्या कृपादानांचे संरक्षण कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.

## चिंतन

पिता आणि पुत्र ह्या मानवी नातेसंबंधाच्या संकल्पना असल्यामुळे परमेश्वरपिता आणि देवपुत्र ह्या प्रतिमा माणसाला सहज समजू शकतात मात्र पवित्र आत्मा ही दृश्य संकल्पना नसल्याने ती मूर्त स्वरूपात व्यक्त करण्यासाठी काही प्रतीके वापरली जातात त्यामुळे पवित्र आत्मा ही पवित्र त्रैक्यातील एक व्यक्ती आहे, तो साक्षात् परमेश्वर आहे हे सत्य नजरेआड होऊ शकते. आजची वाचने पवित्र आत्म्याची प्रतीके, दाने आणि फळे आपल्यासमोर सादर करतात.

**अ) पवित्र आत्म्याची प्रतीके :** आजचे पहिले वाचन (प्रे.कृ.२:१–११) पवित्र आत्म्याची दोन प्रतीके आपल्यासमोर सादर करते : वारा आणि अग्नी. ही दोन्ही प्रतीके जुन्या करारात परमेश्वराच्या दिव्य उपस्थितीसाठी वापरण्यात आलेली आहेत. देवाने प्रारंभी जेव्हा आकाश आणि पृथ्वी ह्यांची निर्मिती केली तेव्हा परमेश्वराचा आत्मा जलाशयावर विहार करीत होता. मोशेला तर परमेश्वर जळत्या झुडपात प्रकट झाला. आता पेन्टेकॉस्टच्या प्रसंगी सुसाट्याचा वारा आणि अग्नीजिभा ह्यांच्या रूपाने पवित्र आत्मा प्रेषितांवर उतरला. त्यांनाही परमेश्वराच्या दिव्य उपस्थितीची जाणीव झाली. त्यांचे प्रेषितकार्य स्पष्ट झाले. ते धैर्याने देवाचे वचन सांगू लागले.

**ब) पवित्र आत्म्याची दाने :** आजचे दुसरे वाचन (१ करिंथ.१२:३ब–७) आपल्यासमोर आध्यात्मिक दाने, सेवा आणि कृत्ये ह्यांचे उगमस्थान व हेतू स्पष्ट करते. त्यांचा उगम पवित्र त्रैक्याठायी आहे. आत्मा कृपादाने देतो, पुत्र सेवेस प्रवृत्त करतो आणि पिता कार्य करण्यास सामर्थ्य देतो. त्यांचा हेतू हा सार्वजनिक हित हा होय म्हणजेच देवाचा गौरव आणि समाजाचे कल्याण ही पवित्र आत्म्याच्या दानांची दोन मुख्य ध्येये होत.

**क) पवित्र आत्म्याची फळे :** पेन्टेकॉस्टच्या दिवशी पवित्र आत्म्याचे आगमन सर्वांसमक्ष झाले. पुनरुत्थानाच्या दिवशी संध्याकाळी मात्र येशूने बंद खोलीत प्रेषितांना पवित्र आत्म्याचे दान दिले (योहान २०:१९–२३). त्यानंतर ते आनंद, शांती, क्षमाशीलता अशी फळे अनुभवू लागले.

**आत्मपरीक्षण :** माझ्या जीवनात मी कोणकोणत्या बाबतीत पवित्र आत्म्याचे कार्य, दाने व फळे अनुभवतो? त्यात कोणकोणते अडथळे येऊ शकतात?

●●●

| मे/जून २०२३ | दैनंदिन बायबल वाचने | | चौथा सप्ताह |
|---|---|---|---|
| सोम २९ | सं मॅडलीन सोफी बारात (हि) | : पवक्ता १७:२४–२९/मार्क १०:१७–२७ | |
| मंगळ ३० | सं जॉन ऑफ आर्क (हि) | : पवक्ता ३५:१–१२/मार्क १०:२८–३१ | |
| बुध ३१ | कुमारी मरीयेची एलिझाबेथशी भेट (पां) | : पवक्ता ३६:१–१७/मार्क १०:३२–४५ | |
| गुरु ०१ | सं जस्तीन (तां) | : पवक्ता ४२:१५–२५/मार्क १०:४६–५२ | |
| शुक्र ०२ | सं मार्सेलीनुस व सं पीटर (हि/तां) | : पवक्ता ४४:१, ९–१३/मार्क ११:११–२६ | |
| शनि ०३ | सं चार्लस ल्वांगा व सहकारी (तां) | : पवक्ता ५१:१२–२०/मार्क ११:२७–३३ | |